# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-७८ दिनांक - ०७/०३/२०२४

## प्रेसनोट

### विरार पोलीस ठाणे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार ०१ वर्षासाठी तडीपार

आगामी काळात होवु घातलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ ची प्रक्रिया शांतेत व सुरळीत पार पाडण्या करीता गुन्हेगारी वृत्तीचे लोकांवर अंकूश लावुन वाढते गुन्हेगारीस आळा घालणेसाठी मा. वरिष्ठांनी प्रतिबंधात्मक कारवाई करणे बाबत आदेशित केले आहेत. त्याअनुषंगाने विरार पोलीस ठाणे रेकार्डवरील गुन्हेगारांची माहिती घेवुन, सराईत गुन्हेगार नामे. **श्री. मोहम्मद सिकंदर अब्दुल गफार शेख, वय ५१ वर्षे**, रा. रुम नं.१, जे.डी.एस. बिल्डींग, बाबानगर, गोपचपाडा, विरार(पु.), ता.वसई, जि.पालघर याचा अभिलेखाची पाहणी करता, त्याचे विरुध्द विरार पोलीस ठाणेत खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| क्रं. | पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १ | विरार | गा ६१६/२०२०, एन.डी.पी.एस. ॲक्ट-८(क), २० प्रमाणे |
| २ | विरार | गा १२६८/२०२१, एन.डी.पी.एस. ॲक्ट-८(क), २२ प्रमाणे |
| ३ | विरार | गा ६२९/२०२२, एन.डी.पी.एस. ॲक्ट-८(क), २२(ब), ii(अ) प्रमाणे |
| ४ | विरार | गा ६२२/२०२३, एन.डी.पी.एस. ॲक्ट-८(क), २२ प्रमाणे |

नमुद रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे. **श्री.मोहम्मद सिकंदर अब्दुल गफार शेख, वय-५१ वर्षे**, याचेवर वरिल प्रमाणे गुन्हे दाखल असुन, तो मोकळा राहीला तर त्यास कायदयाची भिती न राहता तो अशाच प्रकारचे गुन्हे करिल, त्याच्या या प्रवृत्तीला कोठेतरी आळा बसुन, विरार परिसरात सार्वजनीक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहण्याकरिता त्याचेवर प्रतिबंधक कारवाई होणे कामी हद्दपार प्रस्ताव मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-३, विरार विभाग यांना सादर करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने मा.पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार यांनी इसम नामे. **श्री.मोहम्मद सिकंदर अब्दुल गफार शेख, वय-५१ वर्षे**, यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम-५६(अ)(ब) अन्वये चौकशी करुन पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर या जिल्हयांमधुन ०१ वर्षा करीता हद्दपारीचे आदेश पारित केले असुन, सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/संदिप जाधव, संदिप शेरमाळे, पोना/संतोष शेंडे, पोअं/संदिप शेळके, यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.



-----ooo-----

।।।।।